# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | PRESS CLIPPING | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [3rd Day] | | | | |
| Publication | Tarun Bharat | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 14/11/16 |

# मिथेनॉलचा वापर देशाच्या आर्थिक हिताचा

**● डॉ. सारस्वत यांची माहिती ● ॲग्रो व्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन व परिसंवाद**




मार्गदर्शन करताना डॉ. विजय कुमार सारस्वत. बाजूला नितीन गडकरी, राजीव मिश्र व इतर पदाधिकारी

तभा वृत्तसेवा
नागपूर, १३ नोव्हेंबर

पृथ्वीतलावर जीवाश्म खनिज तेलांचे साठे मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. तरीही संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये या खनिज साधनसंपत्तीचा उपभोग घेतला जात आहे. ग्लोबल वार्मिंग, वातावरणामध्ये कार्बन डाय ऑक्साईडची वाढ आदी विविध समस्यांच्या माध्यमातून याचा विपरीत परिणाम सृष्टीवर होताना दिसत आहे. अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रदूषणरहित मिथेनॉलचा उपयोग करून देशाचे आर्थिक व सामाजिक हित जोपासले जाऊ शकते, अशी माहिती नीती आयोग सदस्य व डीआरडीओचे माजी महासंचालक डॉ. विजय कुमार सारस्वत यांनी दिली.

रेशीमबाग मैदानावर आयोजिण्यात आलेल्या चार दिवसीय ॲग्रो व्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनानिमित्त रविवारी 'कोळसा ते मिथेनॉल' या विषयावर घेण्यात आलेल्या परिसंवादाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, गृह राज्यमंत्री हंसराज अहिर व वेकोलिचे मुख्य महाप्रबंधक राजीव मिश्र उपस्थित होते.

डॉ. सारस्वत पुढे म्हणाले, २००२-०३ या वर्षापासून हायड्रोजनचा उपयोग कसा करावा या विषयी अनेक प्रयोग व सल्लामसलत सुरू आहे. मात्र, हायड्रोजनचा वापर खर्चीक असल्याने हायड्रोजनला सामावून घेणारा मिथेनॉलचा विचार पुढे आला. मिथेनॉलचा वापर करून विद्युत, कृषी खत व युरिया अशा उपयुक्त गोष्टी मिळवता येतात. जगामध्ये सर्वाधिक मिथेनॉलचा वापर चीन हा देश करीत आहे. यासाठी चीनने अनेक प्रकल्प विकसित केलेले असून येथील एकूण ९ प्रकल्पांसाठी त्यांनी भारतसोबत करार केला आहे.

अनेक देशांमध्ये जहाज वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर आळा घाण्यासाठी मिथेनॉलचा इंधन म्हणून अधिक प्रमाणात वापर केला जावा असा नियमच तयार करण्यात आला आहे. जर भारतामध्ये प्रदूषण नियंत्रित करायचा असेल तर ९५ टक्के मिथेनॉल व ५ टक्के डिझेल असे प्रमाण साधने आवश्यक आहे. याशिवाय भारतीय रेल्वे, सशस्त्र दल आदीसाठी डिझेलऐवजी मिथेनॉलचा उपयोग करता येऊ शकतो. ग्रामीण भागाचा विचार केला तर आजही ५ करोड लोकांच्या घरी गॅसचे कनेक्शन नाही. अशा परिस्थितीमध्ये 'कॉक स्टो' या मिथेनॉलवर चालणाऱ्या स्वयंपाकी स्टोव्हचा पर्याय उपलब्ध करून देता येऊ शकते. भारतामध्ये केवळ ४ ठिकाणी मिथेनॉलचे प्रकल्प आहेत. या प्रकल्पांना कोळशाचा पुरवठा करून मोठ्या प्रमाणामध्ये मिथेनॉलच्या उत्पदनात वाढ करता येऊ शकते असेही ते म्हणाले.

(पान १७ वर) ▸

विचारलेल्या अनेक प्रश्नांचा उत्तर दिला.